# कृषि उत्पन्न बाजार समिती,जालना

श्रीछत्रपती शिवाजी महाराज बाजार संकुल,भोकरदन-देऊळगांव राजा रिंग रोड,जालना

**उप बाजार पेठ:-रामनगर,नेर,सेवली**

फोन ऑफीस – 02482-229107,229655 Email- am_jalna@msamb.com

जा.क्र. 916 /2026-2027 दिनांक :- 29.09.2026

प्रति,
**मा.शाखा व्यवस्थापक,**
आय.सी.आय.सी.आय.होम फायनान्स लि.,
शाखा छ.संभाजीनगर (औ.बाद).

**विषय :- बँक लोनसाठी ना- हरकत प्रमाणपत्र मिळणे बाबत ...**

महोदय,

वरील विषयास अनुसरून आपणांस प्रमाणित करण्यात येते की, **श्री.संजय गंगाबिशन बाहेती** यांनी कृषी उत्पन्न बाजार समिती, जालनाच्या नविन बाजार संकुलातील **भुसार मार्केट मधील भुखंड/गाळा क्रमांक D-०१** हा गाळा बाजार समितीकडून नोंदणीकृत लीज डीड / लिव्ह अँड लायसन्स करारान्वये ताब्यात घेतलेले आहे.

सदर भुखंड/गाळ्यांबाबत करण्यात आलेल्या लीज करारातील अटी व शर्ती तसेच बाजार समितीच्या नियमांच्या अधीन राहून, संबंधित गाळा आपल्या बँकेकडे तारण (Mortgage / Equitable Mortgage) ठेवून कर्ज व्यवहार करण्यास या कार्यालयाची कोणतीही हरकत नाही.

तसेच, संबंधित भुखंड/गाळाधारक, कर्जदार व बँक यांनी लीज करारातील सर्व अटी व शर्ती, कराराचा कालावधी, नूतनीकरण (Renewal) तसेच बाजार समितीचे नियम व अटी यांचे पालन करणे बंधनकारक राहील.

याशिवाय, सदर गाळे यापूर्वी इतर कोणत्याही बँक/वित्तीय संस्थेकडे तारण ठेवण्यात आले असल्यास अथवा भविष्यात कोणताही वाद, हक्क, देणी, थकबाकी किंवा कायदेशीर अडचण निर्माण झाल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी संबंधित भुखंड/गाळाधारकाची राहील व त्यास बाजार समिती जबाबदार राहणार नाही.

तसेच, संबंधित भुखंड/गाळ्याचे मूल्यांकन, कर्ज रक्कम, दस्तऐवजांची सत्यता व इतर वैधानिक बाबींची पडताळणी संबंधित बँकेने स्वतः करूनच कर्ज मंजूर करावे. याबाबत कृषी उत्पन्न बाजार समिती, जालना कोणत्याही प्रकारे जबाबदार राहणार नाही.

जर संबंधित भुखंड/गाळाधारकाने लीज करारातील किंवा बाजार समितीच्या नियमांतील कोणत्याही अटींचे उल्लंघन केले, तर हे ना-हरकत प्रमाणपत्र कोणतीही पूर्वसूचना न देता आपोआप रद्द व निष्प्रभ समजण्यात येईल.

म्हणून, वरील नमूद भुखंड/गाळे तारण ठेवून संबंधित बँकेमार्फत कर्ज व्यवहार करण्यास व या कर्जात भुखंड/गाळा धारका संबधी कोणतीही कार्यवाही करणेपुर्वी बाजार समितीस कळविण्यांत यावे या अटीवर संबधीत भुखंड/गाळा धारकांस कर्ज दिल्यास या कार्यालयाची ना-हरकत असल्याचे प्रमाणित करण्यात येते.

करिता ना-हरकत प्रमाण पत्र देण्यांत येत आहे.

आपला विश्वासु

सचिव
कृषि उत्पन्न बाजार समिती, जालना